# सुवार्ता नव्या ठिकाणी सांगितली जाते

*मुलांना आरंभीच्या पहिल्या मिशनरींची ओळख करून दया*



*पुढील पैकी कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम मुलांसाठी निवडा.*

*अंत्युखियाच्या मंडळीने कसे मिशनरी पाठवले याचा वृत्तांत मोठ्या मुलाने किंवा शिक्षकाने* **वाचून दाखवावा किंवा सांगावा** *(प्रे.कृ.१३-१-१६ व ३२-५२). येशूची सुवार्ता इतर ठिकाणी सांगण्यासाठी मंडळीने पौल व बर्णबाला कसे पाठवले ते सांगा.*

*पुढील प्रश्न विचारा, प्रत्येक प्रश्नाच्या पुढे उतर दिलेले आहे.*

- *देवाने शौल व बर्णबा ह्यांना वेगळे सांगितले तेव्हा विश्वासणारे काय करित होते? पाहा वचन २.*
- *शौल व बर्णबा ह्यांना मिशनरी चमू म्हणून पाठवण्यापूर्वी विश्वासणाऱ्यांनी काय केले? पाहा वचन ३.*
- *लोकांना येशूची ओळख करून घेण्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या जादूगाराला देवाने कसे रोखले? (११)*
- *लोकांना त्यांच्या पातकांची क्षमा कशी मिळते? (३८)*
- *कोणत्या गटाच्या लोकांनी सुवार्ता नाकारली? (४५-४६)*
- *पौल व बर्णबाला शहरातून हाकलून दिल्यावर त्यांनी काय केले? (५१)*

*(ह्या वृत्तांताच्या भागांचे* **नाट्यीकरण करा.**

- *मंडळीच्या उपासनेच्या मुख्य पुढाऱ्याशी चर्चा करून ही नाटिका सादर करण्याची व्यवस्था करा.*
- *मुलांकडून नाटकाची तयारी करून घेण्यासाठी वेळ द्या.*
- *तुम्ही सर्व भाग उपयोगात आणलेच पाहिजेत असे नाही.*
- **मोठ्या मुलांनी** *किंवा प्रौढांनी पौल व निवेदक ह्या भूमिका करव्यात.*
- **लहान मुलांना** *पुढील भूमिका द्याः*

**बर्णबा**

**सुभेदार**

**जादूगार**

**ख्रिस्ती लोक**

**यहूदी लोक**

**परराष्ट्रीय लोक**

## नाटिका, भाग १, प्रे.कृ.१३:१-३

**निवेदक:** *वचन १-३ मधून वृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा. ''ख्रिस्ती लोक काय म्हणतात ते ऐका.''*

**ख्रिस्ती लोक:** *''उपास करून एकत्र येऊन देवाची प्रार्थना करणे चांगले आहे.''*

*''पवित्र आत्मा आम्हांला मिशनरी सेवक पाठवण्यास सांगत आहे.''*

*''देव आम्हांला पौल व बर्णबाला पाठवण्यास सांगत आहे.''*

**बर्णबा:** *''होय! आम्ही नवीन ठिकाणी जाऊन सुवार्ता सांगू''*

**ख्रिस्ती लोक:** *''येथे गुडघे टेकून बसा.''*

*''आम्ही आमचे हात तुमच्यावर ठेवून प्रार्थना करू.''*

*''देवाच्या इच्छेनुसार तुम्हांला पाठवण्यास हे सर्व आहे.''*

**पौल व बर्णबा:** *''गुडघे टेकून बसतात.''*

**ख्रिस्ती लोक:** *तुमचे हात पौल व बर्णबाच्या डोक्यावर ठेवून प्रार्थना करा.*

**पौल व बर्णबा:** *एका बाजूने चालत जा.*

## भाग २, प्रे.कृ.१३:४-१२

**निवेदक:** *वृत्तांताचा दुसरा भाग (वचने ४-१२) सांगून म्हणा, ''रोमन सुभेदाराचे म्हणणे काय आहे ते ऐका.''*

**सुभेदार:** *''जा पौलाला घेऊन या. मला त्याच्याकडून येशू विषयी ऐकायचे आहे.''*

**जादूगार:** *''नको महाराज. पौलाला बोलावू नका. त्याचा खोटा संदेश तुम्ही ऐकू नका.''*

**पौल:** *''जादूगारा, तू ह्या माणसाला फसवण्याचा प्रयत्न करीत आहस. देव तुला आंधळा करील!''*

**जादूगार:** *तुमचे डोळे मिटून इकडे तिकडे चाचपडत म्हणा. ''अरे मला खरोखरच दिसत नाही. कोणीतरी कृपा करून माझा हात धरारे!''*

**सुभेदार:** *''पौल, ह्या जादूगाराच्या देवांपेक्षा तुझा देवा अधिक सामर्थ्यशाली आहे. तुझ्या या देवाविषयी मला अधिक ऐकायचे आहे!''*

## भाग ३, प्रे.कृ.१३:१३-१६ व ३२-५२

**निवेदक:** *वृत्तांत सांगून संपवा, वचने १३-१६ व ३२-५२ आणि म्हणा, ''पौलाचे म्हणणे ऐकू घ्या.''*

**पौल:** *''येशूची सुवार्ता ऐका. देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले. तो तुमच्या पातकांची क्षमा करील.''*

**यहूदी लोक:** *''ह्या वेड्या माणसाचे ऐकू नका!''*



**बर्णबा:** *''प्रथम तुमच्याशी आम्ही बोललो, पण तुम्ही येशूला नाकारले. आता आम्ही यहूदी नसलेल्या परराष्ट्रीय लोकांशी बोलतो.''*

**परराष्ट्रीय लोक:** *''देवाने तुम्हांला आमच्याकडे पाठवले याचा आनंद वाटतो.'' ''येशू विषयी आम्हांला आणखी सांगा. आमचा त्याच्यावर विश्वास आहे!''*

**यहूदी लोक:** *''ह्या माणसाला आपल्या गावातून हाकलून दिले पाहिजे!'' बर्णबा व पौलाला बाजूला ढकला. ते आपल्या पायांना लागलेली धूळ झटकत तेथून निघून जातात.*

**बर्णबा व पौल:** *तुमच्या पायांना लागलेली धूळ झटकून निघून जा.*

**निवेदक किंवा मोठा मुलगा:** *नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना तसेच मोठ्या माणसांचे ही आभार माना.*

*पायांचे* **चित्र काढा.** *मुलांना ने उतरून घेण्यासत सांगा. मुलांनी पुढच्या उपासनेच्या वेळी हे चित्र मोठया माणसांना दाखवावे आणि येशूची सुवार्ता ऐकण्यास तयार असणारे लोक शोधण्यासाठी देव आम्हांला कसे पाठवतो ते यावरून दिसते हे स्पष्ट करावे. मोठ्या मुलांनी लहानांचे मदत करावी.*

*पौल व बर्णबाच्या वृत्तांताविषयी प्रश्न विचारा:*

- *मुलांना विचारा, ''सुवार्ता सांगण्यासाठी नव्या ठिकाणी गेलेल्या लोकांची उदाहरणे सांगा.''*
- *मुलांनी उदाहरणे सांगावीत.*
- *मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसाठी केले असेल तर त्यांनी मोठ्या माणसांना हेच प्रश्न विचारावेत.*
- *मुलांनी पान क्र.१ वरील प्रश्न प्रौढांना विचारावेत.*

**पाठ करा** *यहोशवा १:७*

**कविता म्हणा:** *स्तोत्र २९:१-४ ह्या शास्त्रभागातून चार मुलांना प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा.*

*दूरवरच्या ठिकाणी जाऊन सुवार्ता सांगणाऱ्या लोकांबद्दल मोठ्या मुलांना कविता, गीत किंवा लहानशी गोष्ट लिहिण्यास सांगा. हे काम ते आठवडाभरात करतील.*

**प्रार्थना:** *''प्रिय प्रभू, तुझी ओळख नसणाऱ्यांकडे पौल व बर्णबा सारखे अनेक लोक पाठवण्याची तुझी इच्छा आहे. तू आम्हांला जाण्यास सांगशील तेव्हा तुझी हाक आमच्या कानी येऊ दे. तुझ्या आत्म्याने आम्हांला परिपूर्ण कर म्हणजे पौल व बर्णबाप्रमाणे आम्हांलाही निर्भयपणे तुझी सुवार्ता सांगता येईल.''*

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net